# सोशल मिडीया आणि लर्निंग

**प्रा.श्रीमती सुरेखा ठेंग**
*अ.वि.संलग्न शिक्षणशास्त्र महाविद्यालय,*
*नाशिक.*

**डॉ. एस. आर. वाजे**
*ॲड. विठ्ठलराव हांडे शिक्षणशास्त्र महाविद्यालय,*
*नाशिक.*


*गोषवारा (Abstract) :- काही दिवसांपासून समाजामध्ये सोशल मिडियाचा वापर फार प्रचंड प्रमाणात होतानादिसूनयेतोच. इंटरनेटच्या वापरामुळे खूप मोठया प्रमाणात माहितीचे दार उघडे झाले आहे.सोशल मिडीयामुळे लोकांना एकत्र येण्याची संधी निर्माण झाली आहेव ते एकमेकांशी जोडल्या गेले आहेत. ते एकमेकांशी विचारांची देवाणघेवाण करुलागले आहेत. जगातीलसर्वचगोष्टी त्यामुळे त्यांना शक्य झाल्या आहेत. व ते एकमेकांशी जवळीकतासाधत आहेत. सोशल मिडीया आपल्या जीवनात महत्वाची भूमिका पार पाडत आहेव त्याचा प्रभाव जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रावरहोत आहे. त्यात शैक्षणिकक्षेत्र, आर्थिकक्षेत्र, सामाजिक क्षेत्र, राजकिय क्षेत्र इ. समावेश होतो.*

1) प्रास्ताविक (Introduction ) :

व्हॉट्स ॲप (whats app). फेस बुक (face book), यु - टयुब (You tube) हे माध्यम लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनत आहे. हजारोलोकरोजव्हॉट्स ॲप, फेसबुक यांचा वापर लोकांशी कनेक्ट राहण्यासाठी करतानादिसून येतात.बहुतांशलोक, विद्यार्थी रोजचसोशल नेटवर्किंगचा वापर करतानादिसून येतात. लोकांना तो आता त्यांच्या दैनंदिन कामाचाच एक भाग आहे असे वाटायला लागले आहे. बहुतेकलोक फेसबुक (face book), ई - मेल (E-mail), ऑरक्युट (Orkut) , इन्स्टाग्रॅम (Instagram), व्टिटर (Twitter) इ. सोशल मिडीयाचा वापर करुन एकमेकांशी संपर्क साधतात, माहितीची देवाणघेवाण करतात.

विद्यार्थी हेविविध कामांसाठी सोशल मिडीयाचा वापर करतानादिसून येतात प्रामुख्याने अभ्यास
विषयक ज्ञान मिळवण्यासाठी इंटरनेटचा वापर केला जातो.सोशल मिडीयाच्या माध्यमातून आपल्याला हवी ती माहिती अतिशय अचुकव कमी वेळात उपलब्ध करुन दिल्या जाते त्यामुळे सोशल मिडीया हे ज्ञान संपादनाचे एक प्रमुख माध्यम बनतचालले आहे.विश्वासपूर्वक माहिती विद्यार्थ्यांना मिळवता येते. कमी वेळातव अतिशय वेगाने ज्ञानाची भूक भागविता येते.

सोशल मिडीयाचा वापर हा भिन्न भिन्न कामासाठी केला जातो. उदा. वातावरणातील बदलांची माहिती मिळविण्यासाठी, समाजातील घातकगोष्टींची पूर्वसुचना देण्यासाठी, पुर, वादळ, यांची पूर्व सुचना देण्यासाठी व संभाव्य धोके टाळण्यासाठी सोशल मिडीयाचा वापर केला जातो.




फेसबुक (face book) ,इंटरनेट (Internet), व्हॉट्स ॲप (Whats app) व्हिडीओ कॉल (Video call), स्काईप (Skype ) यांच्या वापरामुळे दुसऱ्या देशातील नवीनशैक्षणिक तंत्रज्ञानव तेथीलवातावरणाचावशैक्षणिकसंधीचा उपयोग करता येतो. दुरच्या लोकांबरोबरसंवाद साधण्यासाठी सोशल मिडीया हा महत्वाचा दुवा बनत आहे त्यामुळे गरीबव श्रीमंत ही दुरी कमी करण्यात सोशल मिडीया महत्वाची भूमिका पार पाडतानादिसुन येते.

आधुनिक युगामध्ये सोशल मिडीयाचा वापर हा दैनंदिन जीवनाचा एक अविभाज्य भाग बनला आहे.माणसं ही एकमेकांना जोडल्या गेलीआहेत. लहान मुले हीव्हीडीओ गेम सारख्या मिडीयाचा वापर करतानादिसतातव ते टेक्नोसॅव्ही बनत आहे.वृध्द लोकांपेक्षा तरुण मुले हीसोशल मिडीयाचा जास्त वापर करतानादिसतात. व ते तंत्रज्ञान वापरण्यासाठी एकमेकांना मदत करतात.

शिक्षकांनासोशल मिडीयाचा वापर करुन विद्यार्थ्यांना अद्यावत ज्ञान देता येते पुस्तकात दिलेल्या माहितीपेक्षा जास्त माहिती नेटवरुनशोधून विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची भुक भागवता येते येणाऱ्या आव्हानांना तोंड देण्यासाठी विद्यार्थ्यांची तयारी करुनघेता येते. शिक्षणामध्ये नवनवीन पध्दती येतात त्यांची माहिती सोशल मिडीयामुळे सहज सापडणे शक्य होते.

भविष्यामध्ये या टेक्नॉलॉजीचा वापर केल्या शिवायआपल्या जवळ पर्याय राहणार नाही त्यामुळे जीवनाचा प्रत्येक क्षेत्रातसोशल मिडीयाचा वापर करणेही काळाचीगरज बनतचालली आहे.

## 2 )सोशल मिडीया आणिशिक्षण ( Social Media & Education )

बहुतांश विद्यार्थी आणिशिक्षक यांच्या जवळ स्मार्टफोन असतातव तेसोशल मिडीयाचा वापर शिक्षणासाठी करतात. इतकेच नाही तर काही ॲप (app)वइंटरनेट (Internet), यु - टयुब (You Tube) हेशैक्षणिक साहित्य व माहिती उपलब्ध करुन देतात. दुरस्थ शिक्षणामध्ये सोशल मिडीयाचा वापर करुन आपला शैक्षणिक दर्जासुधारतानासोशल मिडीयाची मदत होतानादिसत आहेवशैक्षणिकगुणवत्ता वाढविण्यात शहरी विद्यार्थी व ग्रामीण विद्यार्थी यांच्यातील अंतर त्यामुळे कमी झाले आहेव शिक्षणाच्या सुविधा सेवांपर्यंत सारख्याच उपलब्ध झाल्या आहेत. सोशल मिडीयाचा वापर उच्चशिक्षणात जास्त प्रमाणात होतानादिसत आहे. पारंपारिक पध्दतीपेक्षा सोशल मिडीयाचा वापर करुन विद्यार्थी स्वतःच्या गतीनेव बुध्दीनेशिकतानादिसत आहे. वेगवेगळे प्रयोग स्वतः करत आहेत.




शैक्षणिक संशोधनामध्ये सोशल मिडीयाचा वापर करुन नवनवीनसंशोधनेलावली जात आहे.सहशेगी शिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होतानादिसून येते.सोशल मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये स्वयंअध्ययनाची प्रेरणा निर्माण होतानाइ- लर्निंगच्या (E Learning) माध्यमातून नवयाने निर्माण झालेले प्रॉब्लेम सोडवण्यास मदत होत. सोशल मिडीया असे प्रॉब्लेम सोडवण्यात मदत करते त्यामुळे विद्यार्थी इ- लर्निंग(E Learning) सारख्या मिडीयाकडे आकर्षितहोतातवशिक्षणातसोशल मिडीयाचा वापर करुन स्वतःच्या अपेक्षाची पुर्ती करुशकतात.

3) सोशल मिडीयाचा शिक्षणावर पडणाराप्रभाव (Impact of Social Media in Education )

1) सोशल मिडीयामुळे जगहे एकछोटेसेखेडे झाले आहे. त्यामुळे आपल्याला खुप माहिती मिळते, खुपज्ञान प्राप्त होते व ते वापरण्याची संधी मिळते.

2) सोशल मिडियामुळे आपली ज्ञानाची कक्षारुंदावतेव ते आत्मसात करण्याची क्षमता वाढीसलागते.

3) हजारो विद्यार्थी गुगलचा वापर शिक्षणासाठी करतात.

4) विद्यार्थी कमी वेळात कम्प्युटर सारख्या साधनाशीसहजतेने हाताळण्यास शिकतात.

5) तंत्रज्ञानाच्या वापरामुळे विद्यार्थ्यांमध्ये व्यावहारिक कौशल्याची वाढ होते.

6) सोशल मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्वतःच्या कलागुणांनावाव देण्याची संधी मिळते व त्यातुन तेस्वतःचाविकास करुशकतात. संगीताचे ड्रॉईंगचेव्हिडीओशेअर करतात. त्यांना कलेची प्रसिध्दी करण्याची संधीसोशल मिडीयामुळे प्राप्त होते.

7) सोशल मिडीयाच्या माध्यमातून विद्यार्थी त्यांच्या आर्थिक अडचणी लोकांपर्यंत पोहचवू शकतातव त्यातून त्यांच्या समस्या सोडवण्यात लोकांची मदत होते.

4) समारोप : वरीलविवेचनावरुन असेलक्षात येते की, सोशल मिडीयाचा वापर हा विद्यार्थ्यांच्या जीवनात अतिशय महत्वाची भूमिका पार पाडतो. त्यामुळे त्याला आपल्या व्यक्तिगत छंदाना मार्केट उपलब्ध करुन देता येते. आर्थिकसंकटावर समाजाची मदत घेवून मात करता येते व उच्चशिक्षणाचे स्वप्न पूर्ण करता येते.सोशल मिडीयाच्या माध्यमातून नोकरीच्या संधीशोधता येतात.व सामाजिक संबंध प्रस्थापित करता येतात. सामाजिक बांधिलकीची भावना निर्माण होण्यास मदत होते.